| | |
|---|---|
| MHND190001472026 | **दिवाणी किरकोळ अर्ज :३२/२०२६**<br>शामराव पिराजी पाटील व इतर<br>वि.<br>नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा लोहा तर्फे<br>शाखाधिकारी ता.लोहा जि.नांदेड |

## <u>निशाणी १ वरील आदेश</u>

**१.** अर्जदारांनी सदरहु अर्ज हा भारतीय वारसा कायद्याचे कलम ३७२ अन्वये वारसा दाखला मिळणेसाठी केला आहे.

**२.** अर्जदारांचे मयत कै.पिराजी बाबा पाटील व मयत कै. प्रयागबाई पिराजी पाटील यांच्याशी असलेले संबंध खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **नाव** | **मयताशी असलेले नाते** |
|---|---|---|
| १. | शामराव पिराजी पाटील | मुलगा |
| २. | विठ्ठल पिराजी पाटील | मुलगा |
| ३. | व्यंकटी पिराजी पाटील | मुलगा |
| ४. | अनुसया किशन कुरे | मुलगी |
| ५. | ज्योती केशव सवराते | मुलगी |
| ६. | मनकर्णा दत्तराम येवले | मुलगी |
| ७. | सविता माधव कराळे | मुलगी |
| ८. | दिशा कैलास पाटील | मुलगी |

**३.** अर्जदारांच्या अर्जात पुढे असे आले आहे की, कै. पिराजी बाबा पाटील दिनांक ०४/०९/२०२१ रोजी बोरगाव येथे व कै. प्रयागबाई पिराजी पाटील ह्या दिनांक २१/१२/२०१८ रोजी बोरगाव येथे मयत झाल्या. पिराजी बाबा पाटील नावे मा.शाखा अधिकारी, दि. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,नांदेड शाखा लोहा ता.लोहा जि.नांदेड येथे रक्कम रु.१७,५२५.०० (अक्षरी सतरा हजार पाचशे पंचवीस केवळ), रक्कम रु. ३२,७१३/- (अक्षरी बत्तीस हजार सातशे तेरा रुपये) व कै. प्रयागबाई पिराजी पाटील यांच्या नावे ७०,५०२/– ( अक्षरी सत्तर हजार पाचशे दोन केवळ) जमा आहे. ती रक्कम मिळण्यासाठी मा.शाखा अधिकारी, दि. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नांदेड

शाखा लोहा ता.लोहा जि.नांदेड यांनी त्यांना वारसा दाखल्याची मागणी केली आहे. अर्जदार हेच मयताचे वारसदार आहेत त्यामुळे त्यांना वारसा प्रमाणपत्र द्यावे अशी त्यांनी विनंती केली.

**४.** व्यंकटी पिराजी पाटील (अर्जदार क्र.०३) याने सर्व अर्जदारांच्या वतीने त्यांचा शपथेवर साक्ष पुरावा (निशाणी क्र.१४) दाखल केलेला आहे. तसेच अर्जदार यांनी मयत कै. पिराजी बाबा पाटील यांची प्रमाणपत्राची प्रत प्रकरणात निशाणी क्र.१६ व कै. प्रयागबाई पिराजी पाटील यांचे मृत्यू प्रमाणपत्राची प्रत प्रकरणात निशाणी क्र.१५ वर दाखल केलेली आहे. त्यानंतर अर्जदारांनी पुरावा बंद पुरसिस निशाणी क्र.१८ दाखल केली आहे.

**५.** अर्जदार यांचे वकीलांनी असा युक्तिवाद केला की, केवळ अर्जदार हेच मयत पिराजी बाबा पाटील व कै. प्रयागबाई पिराजी पाटील यांचे वारस आहे. तसेच मा. शाखा प्रबंधक साहेब दि. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक लि. नांदेड शाखा लोहा ता.लोहा जि.नांदेड यांनी अर्जदारांना देण्यात हरकत नाही (नि.क्र.०९) असे म्हटले आहे. त्यानुसार अर्जदार यांना रक्कम देण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

**६.** वकीलांचा युक्तिवाद ऐकला, अर्जाची व दाखल दस्तऐवजांची पाहणी केली. अर्जदारांनी दाखल केलेल्या कै. पिराजी बाबा पाटील यांच्या मृत्यूपत्राचे अवलोकन केले असता त्यांचा मृत्यू दिनांक ०४/०९/२०२१ रोजी बोरगाव येथे व कै. प्रयागबाई पिराजी पाटील दिनांक २१/१२/२०१८ रोजी बोरगाव येथे झाल्याचे दिसून येत आहे. तसेच वारसाबाबत दिनांक १९/०२/२०२६ च्या दैनिक 'दैनिक समीक्षा' वर्तमानपत्रात जाहिर नोटीस प्रकाशित केली. ती नि. क्र. १२ नुसार अभिलेखात दाखल आहे. तसेच नोटीस ही ग्राम पंचायत कार्यालय, बोरगाव तसेच दिवाणी न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आला तो निशाणी क्र.०७ नुसार अभिलेखात दाखल आहे. तसेच वृत्तपत्रात नोटीस प्रसिध्द होवूनही कोणीही हरकत घेतलेली नाही.

**७.** अर्जदारांच्या हक्कास आक्षेप घेणा-या सर्व इसमांनी घोषणापत्राच्या

तारखेपासून एका महिन्याच्या आत न्यायालयास निवेदन करुन आपल्या हरकती नोंदवाव्या अशी उक्त घोषणापत्राद्वारे त्यांना विनंती करण्यात आली होती. परंतु त्यावरुन पुरेशी होईल अशी कोणाचीही हरकत घेण्यात आली नाही.

८. अर्जदाराने त्याच्या अर्जामध्ये नमूद केले की, त्याला मा. शाखा प्रबंधक साहेब दि. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड शाखा लोहा ता.लोहा जि.नांदेड येथे असलेली जमा रक्कम मिळणेकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जदारांशिवाय मयत पिराजी बाबा पाटील व कै. प्रयागबाई पिराजी पाटील यांना इतर कोणतेही वारस नाहीत. तसेच मयत पिराजी बाबा पाटील व कै. प्रयागबाई पिराजी पाटील यांना अर्जदार हेच वारस आहेत. यासंदर्भात त्यांनी दाखल केलेला पुरावा हा उलटतपास न झाल्यामुळे अबाधित राहिला. अर्जदाराने दाखल केलेले दस्तऐवज व अर्जदाराचा अबाधित पुरावा यावरुन असे लक्षात येते की, पिराजी बाबा पाटील हे दिनांक ०४/०९/२०२१ व कै. प्रयागबाई पिराजी पाटील ह्या दिनांक २१/१२/२०१८ रोजी मयत झाले आहेत. तसेच प्रकरणात दाखल असलेले पुरावे तसेच इतर कागदपत्रांवरुन अर्जदार हेच मयत पिराजी बाबा पाटील व कै. प्रयागबाई पिराजी पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. तसेच पिराजी बाबा पाटील यांच्या नावाने मा. शाखा प्रबंधक साहेब दि. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड शाखा लोहा ता.लोहा जि.नांदेड येथे बचत खाते क्र.१०५२१०००१००३६२४ मध्ये रक्कम रुपये १७,६४६.३७ व त्यांच्याच नावे बचत खाते क्र.१०५२१०००७०११८९५ मध्ये रक्कम रुपये ३२,९४०/– असल्याचे नि.क्र.०९ वर दिसुन येते. तसेच कै. प्रयागबाई पिराजी पाटील यांच्या नावाने मा. शाखा प्रबंधक साहेब दि. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड शाखा लोहा ता.लोहा जि.नांदेड येथे बचत खाते क्र.१०५२१०००७०११८०७ मध्ये रक्कम रुपये ७०,९९१.८९ असल्याचे नि.क्र.०९ वर दिसुन येते. एकंदरीत सर्व बाजूंचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. भारतीय वारसा कायदा, १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे अर्जदार हे मयत कै. पिराजी बाबा पाटील व कै. प्रयागबाई पिराजी पाटील यांचे कायदेशीर वारस असून अर्जदार क्र.०१ ते ०८ यांना मा. शाखा प्रबंधक साहेब दि. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड शाखा लोहा ता.लोहा जि.नांदेड येथे मयताचे नावे जमा असलेले बचत खाते क्र.१०५२१०००१००३६२४ मध्ये रक्कम रुपये १७,६४६.३७ (अक्षरी सतरा हजार सहाशे शेहेचाळीस रुपये व सदतीस पैसे केवळ), खाते क्र.१०५२१०००७०११८९५ मध्ये रक्कम रुपये ३२,९४०/–(अक्षरी बत्तीस हजार नउशे चाळीस रुपये केवळ), खाते क्र.१०५२१०००७०११८०७ मध्ये रक्कम रुपये ७०,९९१.८९ (अक्षरी सत्तर हजार नउशे एक्यान्नव रुपये व एकोणनव्वद पैसे केवळ), त्यावरील व्याजासह द्यावी.

३. नियमानुसार योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन प्रमाणपत्र देण्यात यावे.

NIRANJAN BALASAHEB CHAVAN

Digitally signed by NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Date: 2026.04.04 13:00:21 +0530

**(निरंजन बा. चव्हाण)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, लोहा.

लोहा.
दिनांक : ०२/०४/२०२६

******

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file judgment are same word to word, as per the original judgment -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | V.N.Devare, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,Loha |
| Date | : | 02/04/2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 02/04/2026 |
| Order uploaded on | : | 04/04/2026 |